**प्रकल्प प्रवर्तक मे. महाराष्ट्र सागरी मंडळ, गृहविभाग (बंदरे व परिवहन), २रा मजला, इंडियन मर्कंटाईल चेंबर्स, रामजी कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई – ४०० ००१, महाराष्ट्र यांचा गाव- साखरी नाटे, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी, महाराष्ट्र येथील प्रस्तावित मत्स्य बंदराचा विकास प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. महाराष्ट्र सागरी मंडळ, गृहविभाग (बंदरे व परिवहन), २रा मजला, इंडियन मर्कंटाईल चेंबर्स, रामजी कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई – ४०० ००१, महाराष्ट्र यांचा गाव- साखरी नाटे, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी, महाराष्ट्र येथील प्रस्तावित मत्स्य बंदराचा विकास प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता नाटेनगर विद्यामंदिर सभागृह, मुक्काम पोस्ट -नाटे, तालुका – राजापूर, जिल्हा-रत्नागिरी, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री संजय जिरापूरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण – अतिरिक्त कार्यभार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री चंद्रकांत सूर्यवंशी, अपर जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्रीमती वैशाली माने, उप विभागीय अधिकारी,राजापूर, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी, श्रीमती शीतल जाधव, तहसीलदार-राजापूर, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी, श्री.अभयसिंह शिंदे इनामदार, सहायक आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन, श्री. जगन्नाथ शं सांळुखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. महाराष्ट्र सागरी मंडळ, गृहविभाग (बंदरे व परिवहन), २रा मजला, इंडियन मर्कंटाईल चेंबर्स, रामजी कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई – ४०० ००१, महाराष्ट्र यांचा त्यांच्या गाव- साखरी नाटे, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी, महाराष्ट्र येथील प्रस्तावित मत्स्य बंदराचा विकास प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ब ७ (ई) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २९-०६-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक ३०-०६-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार , दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी सकाळी ११. ०० वाजता मान्यता दिलेली होती, मात्र काही तांत्रिक कारणांमुळे आजची जनसुनावणी ही सकाळी ११.०० वाजता ऐवजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-१२०/२०२४,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०२१६एफटीएस ०२४४

दिनांक १६-०२-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,रत्नागिरी, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी — प्रादेशिक अधिकारी -कोल्हापूर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी - **आयोजक**

सदर अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक रत्नागिरी टाईम्स यामध्ये मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यामध्ये इंग्रजीत दिनांक १०-०२-२०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित शासकीय कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते —

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी,

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रत्नागिरी,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी,

४) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.

५) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

६) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

७) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर — ४१६ ००२

८) उप विभागीय अधिकारी, राजापूर, तालुका-राजापूर,जिल्हा – रत्नागिरी,

९) तहसीलदार, तहसील कार्यालय- राजापूर, तालुका- राजापूर, जिल्हा- रत्नागिरी

१०) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत साखरीनाटे, नाटे, जैतापूर, आंबोळगड, धाऊलवल्ली, दळे, ता.राजापूर, जि. रत्नागिरी

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत क्रं.२, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी – ४१५ ६१२

१२) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी यांना १३ सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, बैठकीचे इतिवृत, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की महाराष्ट्राच्या कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्याच्या पश्चिम किना-यावर साखरी नाटे एक मोठे मासेमारी बंदर असून याठिकाणी मोठ्या प्रमाणात मासेमारी आणि मत्स्यवितरण व्यवसाय चालतो. येथे सुमारे ४५० मासेमारी नौका कार्यरत असून मासळी उतरवून घेण्यासाठी मच्छिमार बांधव ह्या बंदरातील सुविधांचा वापर करतात. मात्र साखरी नाटे क्षेत्रातील मासेमारीच्या मोठ्या प्रमाणाचा विचार

करता मासेमारी करणा-या बोटींच्या व मच्छीमार बांधवांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत.

साखरी नाटे येथे विविध सोयीसुविधांनी सुसज्ज असे मच्छिमार बंदर व्हावे अशी स्थानिक मच्छीमारांची मागणी अनेक वर्षांपासून आहे. त्यामुळे मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी साखरी नाटे येथे मत्स्य बंदर विकसित करण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की भारत सरकारच्या Fisheries & Acqua Culture Infra Structure Development Fund (FIDF) अंतर्गत २२ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या पत्राने या प्रकल्पास मान्यता प्रदान केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील राज्य पर्यावरणीय आघात मुल्यांकन प्राधिकरणाने (SEIAA) सदरहू प्रकल्पास दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी सदर प्रस्तावाला किनारपट्टी नियमन क्षेत्र मान्यता (CRZ Clearance) प्रदान केलेली आहे.

प्रस्तावित मत्स्य बंदराची मासे हाताळण्याची क्षमता ही ३५,०५०.० टन प्रतिवर्ष आहे. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाचा एकूण खर्च रुपये १५३.४७ कोटी असून बंदर सर्व सुविधांसह पूर्ण झाल्यानंतर ते महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागास हस्तांतरित करण्यात येणार आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री अमजाद बोरकर, माजी सभापती, साखरी नाटे सोसायटी, तालुका-राजापूर,जिल्हा-रत्नागिरी:-**

येथे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचे (ईआयए) सादरीकरण करण्यात आलेले आहे. प्रकल्प बांधकाम टप्प्यात पर्यावरणावर होणारे आघात व त्यावरिल शमन उपाय, तसेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर पर्यावरणावर होणारे आघात व त्यावरील शमन उपाय याबाबत सर्व माहिती उपस्थितांना सांगण्यात आलेली आहे. आम्ही सर्वजण पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत दिलेल्या स्पष्टीकरणाबद्दल समाधानी आहोत. प्रकल्पास आमचा पूर्ण पाठिंबा आहे. सदरहू प्रकल्प हा लवकरात लवकर पूर्ण व्हावा अशी आमची सर्वांचीच इच्छा आहे.

श्री अमजाद बोरकर यांनी पुढे सांगितले की बंदरावरील सोयीचा विचार करताना बंदरावरील सोयी आणि बंदरासभोवतालच्या सोयी सुविधांचा येथे उहापोह झालेला आहे. सदरहू प्रकल्पात बोटी लावण्यासाठी प्लॅटफ़ॉर्म विकसित करण्यात येणार आहे. तेथे जाळी दुरुस्त करण्यासाठीही व्यवस्था आहे. बंदरात मासे लिलावासाठी सभागृहाची (Auction Hall) व्यवस्था आहे. वाहतुकीसाठी पार्किंगची व्यवस्था आहे. हे सर्व आराखड्यात दिलेले आहे. ही समाधानाची बाब आहे.

तरी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती करण्यात येत आहे की याठिकाणी मोठ्या प्रमाणात महिला आलेल्या आहेत. त्या मासे विक्रेता महिला आहेत. त्यांना मासे विक्रीसाठी जागा नाही. तरी महिलांसाठी बंदरावर मासे विक्रीसाठी जागा राखीव ठेवण्यात येऊन ती विकसित करण्यात यावी अशी येथील महिलांतर्फे विनंती करण्यात येत आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्पात ancillary facilities साठी स्वतंत्र जागा ही राखीव ठेवण्यात आलेली आहे. मासे विक्रीसाठी शेड बांधून महिलांना तेथे जागा राखीव ठेवण्यात येऊन ती जागा स्थानिक महिला मासे विक्रेतांसाठी विकसित करण्यात येईल.

**२) <u>श्री मनोज मधुकर आडविलकर, राहणार-घेराई बंदर, साखरी नाटे, तालुका-राजापूर,जिल्हा-रत्नागिरी:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पाची व्याप्ती/क्षेत्र (area) कुठपासून कुठपर्यत आहे याची माहिती ही सांगण्यात यावी | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की डुंगरे जेटीचा जो भाग आहे, तेथे ३२५ मीटरचा लांबीचा वार्फ (wharf) आहे. तेथे बोटी पार्क होतील. बोटीतील माल किंवा बोटीवर पाठविणा-या मालाची हाताळणी येथे करता येईल. येथे मासे विक्रीचे सभागृह (Auction Hall) उपलब्ध करण्यात येईल. येथे मोठ्या मच्छिमारांसाठी सोय केलेली आहे. तसेच येथे जी खाच आहे, तेथे लहान मच्छिमारांसाठी ज्यांच्याकडे फायबरच्या बोटी आहेत, त्यांच्यासाठीसुध्दा सोय करण्यात आलेली आहे. येथे माल हाताळणी, बर्फ |

| | | |
|---|---|---|
| | | उतरविण्याची सोय करण्यात आलेली आहे. तसेच जो खाऊ गल्लीचा हा जो भाग आहे, तेथेसुध्दा ३२५ मीटर्सचा वार्फ (wharf) बांधण्यात येऊन सर्व सुविधा उपलब्ध करण्यात येतील. |
| २) | वाहतुकीचा मार्ग कसा असेल? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की वाहतुकीसाठी जुना रस्ता आहे. मात्र जर अतिरिक्त जागा उपलब्ध करुन देण्यात आली, तर नविन रस्ता हा निश्चितपणे बांधून देण्यात येईल. |
| ३) | त्याचा उल्लेख आराखड्यात व अहवालात नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की जर जागा उपलब्ध झाल्यास तो रस्ता विकसित करण्यात येईल. |
| ४) | साखरी नाटेमध्ये एक ऐतिहासिक किल्ला आहे. त्या किल्ल्याच्या बाहेरुन रस्ता तयार करणे शक्य असेल तर वाहतुक सुरळितपणे होऊ शकते. त्यामुळे तेथील ऐतिहासिक किल्ल्याचे काहीही नुकसान होणार नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की जरी नविन रस्ता तयार करण्याचे येथील आराखड्यात सद्यस्थितीत नियोजन नाही, तर याबाबत स्थानिकांनी सहकार्य केल्यास त्याबाबत सर्वेक्षण करण्यात येईल आणि निश्चितपणे या प्रकल्पासाठी कसा उपयोग होईल, यासाठी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. |
| ५) | प्रदूषण आणि पर्यावरण याची पूर्णतः काळजी आणि जबाबदारी घेऊन ही प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे. येथे मच्छिवर प्रक्रिया करण्यासाठी २-३ कंपन्या चालू आहेत. त्यांचे सांडपाणी रस्त्यावर पडते, त्याची एवढी दुर्गंधी परिसरात पसरते. तरी याबाबत ठोस उपाययोजना राबविण्यात याव्यात. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पात औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ईटीपी ,सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. म्हणजे मच्छिवर प्रक्रिया केल्यानंतर निर्माण होणा-या सांडपाणी एकत्रित करुन त्यावर ईटीपीत शास्त्रीय प्रक्रिया करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ६) | अशा प्रकारचे प्रकल्प व्हावेत, ही मच्छिमारांसाठी चांगली गोष्ट आहे. बाजारात महिला मच्छी विकण्यासाठी अक्षरशः रस्त्यावर बसतात. आतापर्यंत जरी कुठलाही अपघात झालेला नसला, तरीही भविष्यात कुठलाही अपघात न होण्यासाठी महिलांना मत्स्य विक्रीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. ती मागणी अत्यंत रास्त आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

**३) श्री मलिक गडकरी, माजी सरपंच, साखरी नाटे, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी:-**

मधला वार्ड साखरी नाटे आहे. हातवणकर तलाव येथील चिखलापर्यंत भराव करणार. तो रस्ता डुंगेरी जेटीजवळ जाईल. तो चीज बंदरपर्यंत जाईल. चीज बंदराच्या पलिकडे पर्यंत जेटीची लांबी आहे. तेथे रस्ता मंजूर केलेला नाही. तर जागा उपलब्ध झाल्यास रस्ता तयार करण्यात येईल, मात्र जेटी प्रकल्प पूर्ण करण्यात कुठलाही प्रकारचा अडथळा नाही.

मी २००२ नंतर सरपंच झालो. २००४ साली सदरहू प्रकल्पाचे तत्कालिन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन झालेले आहे. तरीही त्या जेटीचे काम होऊ शकले नाही. आज माझ्या समोर सदरहू प्रकल्प सुरु होण्यासाठी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित केलेली आहे, त्याचा मला आनंद होत आहे. या प्रकल्पास मनापासून समर्थन देत आहे.

**४) श्री आदिल इब्राहिम म्हसकर, साखरी नाटे मच्छिमारी सहकारी सोसायटी लिमिटेड:-**

मी क्रियाशील मच्छिमार असून माझा या प्रकल्पास पाठिंबा आहे. मात्र मी विचारत असलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात यावीत -

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | बंदराच्या सुरक्षिततेसाठी बॅक वॉटर वॉल बांधण्यात येणार आहे काय? | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्प ही खाडी क्षेत्रात (Creek Area) विकसित करण्यात येत असल्याने या प्रकल्पास बॅक वॉटर वॉलची गरज नाही. सदरहू प्रकल्प जर समुद्रात असता, तर त्यास बॅक वॉटर वॉलची गरज पडली असती. |
| २) | जेटी ही कुठली असणार आहे – पिलर जेटी की भरीव जेटी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की पिलर जेटी असणार आहे. |
| ३) | पाणी पुरवठ्यासाठी कोणती उपाययोजना आखण्यात आलेलीआहे? | प्रथम ग्रामपंचायतीचे पाण्याचे स्त्रोत पाहण्यात येतील. स्थानिक गावांना जेथून पाणीपुरवठा करण्यात येतो, तेथून पाणी आणण्यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात येईल. त्या योजनेची शासनस्तरावर मान्यता घेण्यात येईल |
| ४) | प्रकल्पाची पाणीपट्टी कोण भरणार? | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की भविष्यात पाणीपट्टी ही महाराष्ट्र शासनाचा मत्स्य व्यवसाय विभाग भरेल. |
| | | पकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरणे दिले पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि प्रकल्पातील सांडपाण्याची व्यवस्था ही पूर्णपणे वेगळी राहणार आहे. |
| ५) | स्थानिक मच्छिमारांसाठी फिश मार्केटची व्यवस्था करण्यात आलेली आहे काय? | Ancillary Facilities साठी मोकळी जागा ठेवलेली आहे. त्याठिकाणी स्थानिक मच्छिमारांसाठी व्यवस्था करण्यात येईल. |
| ६) | संस्थांसाठी डिझेलविक्रीसाठी काय व्यवस्था करण्यात आलेली आहे? | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की डिझेल पंपासाठी जागा राखीव ठेवलेली आहे. डिझेल पुरवठा व वितरण हे महाराष्ट्र शासनाचा मत्स्य व्यवसाय विभाग पाहणार आहे. |
| ७) | नेव्हीगेशन टॉवर व्यवस्था बंदरात आहे काय | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात नेव्हीगेशन टॉवर उभारण्यात येईल. |
| ८) | बंदरात कोल्ड स्टोअरेज प्रक्रियेसाठी जागा ठेवण्यात आलेली आहे काय | प्रकल्प प्रवर्तक Ancillary Facilities साठी मोकळी जागा ठेवलेली आहे. त्याठिकाणी कोल्ड स्टोअरेज प्रक्रियेसाठी जागा राखीव ठेवण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ९) | परवाना अधिकारी यांच्याकडे कार्यालयासाठी जागेची व्यवस्था आहे काय? | प्रकल्प प्रवर्तक Ancillary Facilities साठी मोकळी जागा ठेवलेली आहे, तेथे कार्यालयासाठी जागा देण्यात येईल. |
| १०) | बंदराचे व्यवस्थापन भविष्यात कोणाकडे राहणार आहे? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की महाराष्ट्र शासनाचा मत्स्य व्यवसाय विभागाकडे बंदराचे व्यवस्थापन राहणार आहे. महाराष्ट्र सागरी मंडळ (Maharashtra Maritime Board - MMB) हे फक्त बंदर विकसित करणार असून नंतर ते मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येईल. पुढे त्याचे कार्य व देखभाल हे मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन हे पाहतील. |
| ११) | भविष्यात बंदरावर वाद झाल्यास कोणत्या प्राधिकरणाकडे दाद मागायची आहे? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की महाराष्ट्र शासनाचा मत्स्य व्यवसाय विभागाकडे दाद मागण्यात यावी. |
| १२) | बंदरावर वीजेची सोय करण्यात येणार आहे काय? त्याचे बील कोण भरणार? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की वीजपुरवठा उपलब्ध करण्याबाबत अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे. वीजेचे बील हे महाराष्ट्र शासनाचा मत्स्य व्यवसाय विभागाडून अदा करण्यात येईल. |
| १३) | बंदरावर सुरक्षा रक्षक व व्यवस्था काय करण्यात येईल? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे. सुरक्षा रक्षकांसाठी चौकीचे नियोजन आहे |
| १४) | सदरहू प्रकल्पासाठी कोणाचीही खाजगी जमिन अधिगृहित करण्यात येणार आहे काय? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की शक्यतो आम्ही खाजगी जमिनीत प्रकल्प उभारणी करणार नाही. जर खाजगी मालकाने ना हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्यासच त्या जागेवर प्रकल्प उभारणी करण्यात येईल. अन्यथा प्रकल्प हा खाजगी जागा सोडूनच उभारण्यात येईल. |

**५) श्री संदीप रामचंद्र बानकर, सरपंच, नाटे ग्रामपंचायत, तालुका-राजापूर,जिल्हा-रत्नागिरी:-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | जेटीचा प्रस्तावित प्रकल्प हा साखरी नाटे येथे उभारणी करण्यात येणार आहे. मात्र नाटे गावाचा कोठेही उल्लेख अहवालात दिसला नाही. तसेच नाटे गावातील ज्या लोकांच्या जमिनी जातात, आंब्याच्या बागा जातात, केळीच्या बागा जातात, त्याबाबत पुढील प्रयोजन व नियोजन काय केलेले आहे? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा पूर्णपणे पाण्यावर आहे. प्रकल्पासाठी जमिनीवर कुठेही झाडे तोडून जागा तयार करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे झाडे तोडून त्यांचे पुनर्रोपण, त्यासाठी कुठलीही वेगळी तरतुद करण्याची आवश्यकता वाटत नसल्याने ती करण्यात आलेली नाही. |
| २) | श्री बानकर यांनी आक्षेप नोंदविला की जरी झाडे तोडणार नसाल, तरी जर जमिन लागत असेल तर त्याबाबत काय प्रयोजन करण्यात आलेले आहे? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आमचा प्रकल्प हा पाण्यावरच उभारला जाणार आहे. तरीही समजा अतिरिक्त जागा/भूखंड लागला, तर संबंधित जमिन मालकांकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तक यांनी आश्वासन दिले की याबाबत शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. |

६) **श्री फय्याज नलेकर, भारतीय जनता पक्ष तालुका राजापूर उपाध्यक्षः-**

मौजे -साखरी नाटे, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी येथील मत्स्य बंदराच्या प्रस्तावित बांधकामाबाबतच्या प्रकल्पाची पर्यावरण जाहिर जनसुनावणी असून माझा या प्रकल्पास संपूर्ण पाठिंबा आहे. त्यांनी उपस्थित सर्व मच्छिमारांना आपला पाठिंबा आहे का अशी विचारणा केली. सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे पाठिंबा असल्याचे सांगितले. पूर्वीपासून मच्छिमार या बंदराचा वापर करत असून ३००-४०० कोटींचा व्यवसाय होतो. बंदर पूर्ण झाल्यानंतर तेथे गाड्यांचा वापर व मालवाहतुक मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे अशी विनंती आहे की गुणामस्तर बंदर रोड व सर्व टोल नाके असा एक सिमेंट कॉक्रीटचा दर्जेदार रस्ता किंवा पर्यायी काही रस्ते जे बंदराकडे जातील, ते जोडरस्ते उपलब्ध करुन देता येतील काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आपण केलेल्या मागणीनुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल व लवकरात लवकर रस्ता प्रकल्प मंजूर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

७) **श्री नदीम अब्दुल रझाक कणसे, अध्यक्ष, साखरी नाटे मच्छिमार सहकारी सोसायटी तालुका-राजापूर,जिल्हा-रत्नागिरीः-**

सदर प्रकल्पास आमच्या जमातीतर्फे पूर्ण पाठिंबा देत आहोत. बैठकीत हा जो जल्लोष, आनंद पाहत आहोत, त्याचे कारण गेले अनेक वर्षे स्थानीक मच्छिमारांना मासेमारी करताना त्रास होत आहे, छोट्या मच्छिमारांना छोट्या बोटी हाताळताना, मोठ्या मच्छिमारांना मोठ्या बोटी हाताळताना जो त्रास होत आहे, मच्छिविक्रेत्या ज्या महिला आहेत, त्यांना रोज होणारा त्रास, यातून प्रस्तावित प्रकल्पामुळे सुटका होण्याचे दिसत आहे, त्यामुळे ही जल्लोष दिसत आहे. गेले अनेक वर्षे आम्ही पाहिलेले स्वप्न साकार होत आहे. कारण लहान मच्छिमार मोठा कसा होईल, सर्वांना काम कसे मिळेल यासाठी आपला व्यवसाय करत असून आता कुठेतरी आशा दिसत आहे. म्हणून आमचा या प्रकल्पास पूर्ण पाठिंबा आहे.

त्यांनी पुढे प्रश्न विचारला की बोटी दुरुस्त करण्याचे जे ठिकाण दाखविलेले आहे, ते सकल आहे की भरीव. तसे च डोंगरावरून जे पाणी येते, ते गावाचे पिण्याचे पाणी आहे. ते खराब होऊ नये. त्या बाबतील नियोजन सांगावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आराखडा तयार करताना गावाचे जे पावसाचे पाणी आहे, हा डोंगरभाग असल्याने गावाचे पावसाचे पाणी एकत्रित होऊन मोठ्या प्रमाणात वाहणार आहे. त्यासाठी खुली गटारे (Open Gutters) बांधणार आहोत. फायबरची गटारे न ठेवता खुली गटारे (Open Gutters) ठेवलेली आहेत. ते प्रकल्प विकसीत करताना अंतर्भूत आहेत.

जसे मुंबईची लोकल ही लाईफलाईन आहे, तसेच साखरी नाटे परिसरातील मच्छिमार समाज हा लाईफलाईन आहे. जर दोन दिवस बोटी उभ्या राहिल्या, तर येथील दररोजच्या स्थानिक व्यवसायावर, जीवनमानावर परिणाम होतो. तर ती लाईफलाईन चांगली राहावी. आमचा प्रकल्पास जाहिर पाठिंबा असून आमच्या जमातीतर्फे लेखी निवेदन सादर करत आहे.

८) **<u>श्री शफी महंमद वाडकर, अध्यक्ष, साकीनाका मच्छिमारी सहकारी सोसायटी लिमिटेड, साखरी नाटे,तालुका-राजापूर,जिल्हा-रत्नागिरीः-</u>**

आमच्या संस्थेचे सभासद ३,५०० आहेत. मच्छिमार ४,५०० आहेत. माझ्या सर्व सभासदांचा व येथील स्थानिक मच्छिमारांचा या प्रकल्पास पूर्ण पाठिंबा आहे.

९) **<u>श्री महिम तोडकर, मच्छिमार, साखरी नाटे, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरीः-</u>**

या गावात आम्ही कित्येक दिवस मच्छिमारीचा धंदा करत आहोत. मच्छिमारी धंद्यासाठी पुरक गोष्टी नसल्यामुळे मच्छिची विक्री व नंतरची वेळेवर विल्हेवाट लावणे

कठीण होते. तरी प्रस्तावित प्रकल्पाचे नियोजन केल्याबद्दल प्रथम शासनास धन्यवाद देतो. तसेच या बंदरावर मच्छीवर प्रक्रिया करण्यासाठी आम्ही छोटासा कारखाना उभारलेला आहे. त्यास शासनाकडून वीस कोटी कर्जसुध्दा मिळालेले आहे. परंतु त्या कारखान्याला जी मच्छि मिळते, ती चांगल्या प्रकारची यायला पाहिजे, म्हणून या बंदराची अत्यंत आवश्यकता आहे. तरी हे बंदर लवकरात लवकर होणे गरजेचे आहे.

**१०) <u>श्रीमती गुलजार शफी ठाकूर, सरपंच, साखरी नाटे सरपंच, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी:-</u>**

साखरी नाटे सरपंच या नात्याने मी ग्रामपंचायत व सर्व जनतेतर्फे येथे सांगते की या प्रकल्पास आमच्या सर्वांचा पाठिंबा आहे.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थोतांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्रीमती वैशाली माने, उप विभागीय अधिकारी,राजापूर, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी, श्रीमती शीतल जाधव, तहसीलदार-राजापूर, तालुका-राजापूर, जिल्हा-रत्नागिरी, श्री अभयसिंह शिंदे इनामदार, सहायक आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन, श्री जगन्नाथ शं सांळुखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन सांगितले की सर्व उपस्थित ग्रामस्थांचे आभार व धन्यवाद देण्यात येतात की २१ व्या शतकाकडे जाताना व विकासाची धोरणे राबविताना अशा प्रकल्पाची आवश्यकता आहे. बैठकीत अनेकांनी त्यांचे मनोगत व्यक्त केलेले आहे. बैठकीत काही जणांनी तोंडी त्याचप्रमाणे लेखी सूचना किंवा आक्षेप नोंदविलेले आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की वास्तविक पहाता आज ११.० वाजता जनसुनावणी होती, मात्र काही तांत्रिक कारणांमुळे ती सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. येथे सर्व ग्रामस्थांनी याबाबत केलेल्या सहकार्याबद्दल आभार.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू बैठकीचे इतिवृत मराठीत व इंग्रजीत तयार करण्यात येणार असून त्यासोबत प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप व सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अध्यक्ष,

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू बैठकीचे इतिवृत मराठीत व इंग्रजीत तयार करण्यात येणार असून त्यासोबत प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप व सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फ राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्वांचे आभार मानून जनसुनावणी पूर्ण झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संपन्न करण्यात आली. प्राप्त झालेल्या – १३ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडलेल्या आहेत.

**(संजय जिरापूरे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
चिपळूण
(अतिरिक्त कार्यभार-
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण
मंडळ, रत्नागिरी)

**(जगन्नाथ साळुंखे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(चंद्रकांत सूर्यवंशी)**
अध्यक्ष
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,रत्नागिरी
जिल्हा-रत्नागिरी